मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | » पुणे, पिंपरी-चिंचवड | » शुक्रवार, दि. 18 ऑक्टोबर 2024 | पान- 1

# अनधिकृत फ्लेक्स लावल्यास आता दाखल होणार गुन्हे

## महापालिकेचा आकाशचिन्ह व परवाना विभाग झाला सक्रिय : फ्लेक्सवर कारवाई करण्यास प्रशासनाने प्रारंभ केला आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिका निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यानंतरही शहरात झळकणाऱ्या फ्लेक्सवर कारवाई करण्यास प्रशासनाने प्रारंभ केला आहे. ही कारवाई आणखी कठोर होणार असल्यामुळे अनधिकृतपणे संपर्क कार्यालय सुरू करू नयेत, तसेच पोस्टर्स लावू नयेत, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

विधानसभेचा निवडणूक कार्यक्रम मंगळवारी (दि.१५) जाहीर झाल्यानंतर त्याच दिवसापासून आचारसंहिता लागू झाली आहे. त्याची कडक अंमलबजावणी करण्यास प्रशासनाने सुरुवातही केली आहे. ज्याठिकाणी आचारसंहितेचा भंग झाला आहे, अशा ठिकाणी नियमानुसार कारवाईला प्रारंभ झाला आहे. त्यानुसार, महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाच्या वतीने अनधिकृच फ्लेक्स, बॅनर्स काढण्यात आले.



आचारसंहिता लागण्यापूर्वी विविध निविदा मंजूर करण्यासोबतच मंजूर झालेल्या कामाच्या कार्यारंभ आदेश काढण्यासाठी महापालिकेत दोन दिवस धावपळ सुरू होती. आचारसंहितेमध्ये आपल्या भागातील विकासकामांच्या निविदा अडकून पडू नये, या निविदा मान्य होऊन काम सुरू करण्याची परवानगी मिळावी, यासाठी शहरातील विद्यमान आमदारांसह आजी-माजी नगरसेवकांची आणि ठेकेदारांची गर्दी पालिकेत पहायला मिळाली. अधिकाधिक विकासकामे मार्गी लागावी यासाठी रात्री उशिरापर्यंत काही विभाग आणि तेथील अधिकारी महापालिकेत कार्यरत होते.

> महापालिका कार्यक्षेत्रात विनापरवाना राजकीय पक्षाचे झेंडे, बॅनर्स, प्लेक्स आढळल्यास संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात येतील, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, असे प्रशासनाने कळवले आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षांनी सभेसाठी मैदान, सभागृह याबाबत परवानगी घेणे आवश्यक आहे. त्यासाठी विशेष कक्ष सुरू करण्यात येणार आहे.
> - शेखर सिंह, आयुक्त, महापालिका.

महाराष्ट्र राज्य सार्वत्रिक विधानसभा निवडणूक २०२४ ची घोषणा मंगळवारी (दि. १५) भारत निवडणूक आयोगाने केली आहे. त्यामुळे आदर्श आचारसंहिता लागू झाली असून या आदर्श आचार संहितेची सर्व प्रशासकीय यंत्रणांनी काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, असे आदेश आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिले आहेत.

# पीएमआरडीएच्या गृहप्रकल्प योजनेस प्रतिसाद

## चिखली, वाल्हेकरवाडीतील सदनिकांसाठी पाच दिवसांमध्ये ऑनलाईनद्वारे 907 नागरिकांचे अर्ज प्राप्त

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) पेठ क्रमांक 12 (चिखली) येथील प्रधानमंत्री आवास योजनेतील 661 सदनिका आणि वाल्हेकरवाडी, पेठ क्रमांक 30 व 32 येथील 676 सदनिकांसाठी ऑनलाईन अर्जाद्वारे नोंदणी करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. गेल्या पाच दिवसांमध्ये त्यासाठी 907 नागरिकांनी अर्ज केले आहेत.



शनिवारी (दि. 12) दसऱ्याच्या मुहूर्तापासून ऑनलाईन अर्ज करण्याची प्रक्रिया सुरू झाली. 12 नोव्हेबरपर्यंत ही मुदत आहे. पेठ क्रमांक 12 येथे पीएमआरडीएच्या वतीने पहिल्या टप्प्यात एकूण 4 हजार 883 सदनिका उभारलेल्या आहेत.

त्यातील शिल्लक राहिलेल्या सदनिकांसाठी ऑनलाईन सोडत काढली जाणार आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील (ईडब्ल्यूएस) नागरिकांसाठी 47 वन बीएचके आणि अल्प उत्पन्न गटातील (एलआयजी) नागरिकांसाठी 614 टू बीएचके सदनिकांचे वितरण केले जाणार आहे.

वाल्हेकरवाडी गृहप्रकल्पातील ईडब्ल्यूएस प्रवर्गातील 347 वन आरके सदनिका आणि एलआयजी प्रवर्गातील 329 सदनिका अशा एकूण 1337 शिल्लक सदनिकांसाठी सोडतीची प्रक्रिया सुरू झालेली आहे.

सेक्टर 12 मधील एलआयजी प्रवर्गातील 59.27 चौरस मीटर क्षेत्राच्या टू बीएचके सदनिकांची किंमत 35 लाख 57 हजार 200 रुपये इतकी निश्चित केलेली आहे. वाल्हेकरवाडी येथील ईडब्ल्यूएस प्रवर्गातील 25.52 चौरस मीटर क्षेत्राच्या वन आरके सदनिकांची किंमत 20 लाख 90 हजार 771 इतकी आहे. अल्प उत्पन्न गटाच्या 34.57 चौरस मीटर क्षेत्राच्या वन बीएचके सदनिकांची किंमत 28 लाख 32 हजार 208 रुपये इतकी निश्चित केलेली आहे. ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी HOUSING. PMRDA.GOV.IN या संकेतस्थळाला भेट द्यावी.

### ईडब्ल्यूएस घरांची किंमत कमी होणार

**»पेठ क्रमांक 12 येथील पंतप्रधान आवास योजनेतील ईडब्ल्यूएस प्रवर्गातील 29.55 चौरस मीटर क्षेत्राच्या वन बीएचके सदनिकांची किंमत 15 लाख 74 हजार 424 इतकी आहे. त्यासाठी शासनाची अडीच लाख रुपयांची सबसिडी मिळणार आहे. त्यामुळे या घरांची किंमत कमी होणार आहे.**

# चिंचवड, पिंपरी, भोसरीसाठी 1442 मतदान केंद्र

## तीन मतदार संघात 16 लाख 43 हजार 822 मतदारांची नोंद

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्य निवडणूक आयोगाने राज्याच्या विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम आज जाहीर केला. त्यानुसार निवडणुकीसाठी अर्ज भरुन घेणे, अर्ज मागे घेणे, मतदान आणि निकाल याच्या तारखा निश्चित करण्यात आल्या.

पिंपरी-चिंचवड शहरातील चिंचवड, पिंपरी आणि भोसरी या तीन विधानसभा मतदार संघात एकूण १६ लाख ४३ हजार ८२२ मतदार असून त्यांचे मतदान घेण्यासाठी तिन्ही मतदार संघात एकूण १४४२ मतदान केंद्रे तयार करण्यात येणार आहेत, अशी माहिती राज्याच्या निवडणूक विभागाकडून जाहीर करण्यात आली आहे.

विधानसभा निवडणुकीबाबत इच्छुक उमेदवार तसेच कार्यकर्त्यांमध्ये कमालीची उत्सुकता होती. अखेर आज मंगळवारी (दि. १५) राज्य निवडणूक आयोगाने आदर्श आचारसंहितेची घोषणा करत निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला. राज्यात एकाच टप्प्यात निवडणूक घेतली जाणार आहे.



गॅझेट नोटिफिकेशनची तारीख २२ ऑक्टोबर जाहीर केली आहे. उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख २९ ऑक्टोबर आहे. ३० ऑक्टोबरला अर्जांची छाननी केली जाणार आहे. ४ नोव्हेंबर २०२४ रोजी अर्ज मागे घेता येणार आहेत. २० नोव्हेंबर रोजी मतदान घेतले जाणार आहे. तर, २३ नोव्हेंबरला निवडणुकीचा निकाल जाहीर केला जणार आहे.

शहरातील २०५ चिंचवड, २०६ पिंपरी, २०७ भोसरी या तिन्ही विधानसभा मतदार संघासाठी एकूण १४४२ मतदान केंद्रांची व्यवस्था केली जाणार आहे. त्यातच शहरातील चिंचवड हा सर्वात मोठा मतदार संघ असून या मतदार संघात ६ लाख ५५ हजार १०६ मतदार आहेत. त्याखालोखाल भोसरी मतदार संघ येत असून येथे ६ लाख ८४८ मतदार आहेत. तर, पिंपरी मतदार संघात ३ लाख ८७ हजार ८६८ मतदार आहेत.

एवढ्या मतांची नोंदणी करवून घेण्यात येणार असून त्याकरिता चिंचवड मतदार संघात ५६१ मतदान केंद्र, पिंपरीसाठी ३९८ तर भोसरीसाठी ४८३ मतदान केंद्र तयार केली जाणार आहेत, असे राज्याच्या निवडणूक विभागाकडून कळविण्यात आले आहे.

# महापालिकेच्या मालमत्ता करवसुलीला स्थगिती

## मुख्यमंत्र्यांनी आचारसंहिता जाहीर होण्याच्याच दिवशी 32 गावांमधील मालमत्ता करवसुलीला स्थगिती दिली

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेच्या तिजोरीवर ताण येत असताना राजकीय फायद्यासाठी मुख्यमंत्र्यांनी आचारसंहिता जाहीर होण्याच्याच दिवशी ३२ गावांमधील मालमत्ता करवसुलीला स्थगिती दिली आहे. या निर्णयाचे गावकऱ्यांनी स्वागत केले असले तरी पुणेकरांनी मात्र यावर नाराजी व्यक्त केली आहे.

पुणे महापालिकेत समाविष्ट झालेल्या ३२ गावांमधील मिळकतकर आकारणीसंदर्भात आमदार भीमराव तापकीर आणि माजी आमदार विजय शिवतारे यांनी मिळकतकराची आकारणी संदर्भात मुख्यमंत्र्यांकडे तक्रार केली होती. त्यामुळे महापालिकेत समाविष्ट झालेल्या ३२ गावातील मालमत्ता कर हा ग्रामपंचायतीकडून आकारण्यात येणाऱ्या कराच्या दुप्पट दराने आकारण्यात यावा आणि गावाचा मालमत्ता कर आधीच्या ग्रामपंचायत कराच्या दुप्पटीपेक्षा जास्त होणार नाही, अशा पद्धतीने पुनर्विलोकन करेपर्यंत मालमत्ताकर वसूल करण्यास स्थगिती देण्याबाबात राज्य सरकारच्या नगरविकास खात्याने आदेश दिले आहेत.



### 32 गावांमधील कराची फेररचना करावी लागणार

» शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि माजी मंत्री विजय शिवतारे यांनी मंगळवारी (दि. १५) सकाळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी २३ जुलै २०२४ रोजी ९ गावांना ग्रामपंचायतीच्या मालमत्ताकराच्या दुपटीपेक्षा जास्त कराची आकारणी करु नये, असे आदेश दिले होते. त्याचप्रमाणे पुणे महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या २३ गावांच्या मालमत्ता करासंदर्भाय निर्णय घ्यावा, अशी मागणी केली. त्यामुळे शिवतारे यांच्या पत्रावर मुख्यमंत्र्यानी नगरविकास विभागाला आदेश दिले. यामुळे आता महापालिकेची करवसुली थांबवणार असून महापालिकेला ३२ गावांमधील कराची फेररचना करावी लागणार आहे.

पुणे महापालिका समाविष्ट गावांतील मालमत्ताकराची आकारणी करते. परंतु त्याबदल्यात कोणत्याही सुविधा देत नाही. पायाभूत सुविधा पुरवणे महापालिकेला अद्याप शक्य झालेले नाही. त्यामुळे नागरिकांकडून महापालिकेच्या कारभारावर नाराजी व्यक्त केली जात होती. नागरिकांच्या मागणीनुसार माजी आमदार शिवतारे यांनी राज्य सरकारकडे करवसुलीला स्थगिती देण्याची मागणी केली होती.

दरम्यान, राज्य सरकारकडून आचारसंहितेपूर्वी अनेक लोकप्रिय निर्णय घेतले आहेत. तसेच मोठमोठ्या घोषणा केल्या आहेत. राज्यात विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाली आहे. राज्य सकारच्या या निर्णयाचा फायदा महायुतीच्या उमेदवारांना होण्याची शक्यता आहे. मात्र निवडणुकांसाठी महापालिकेच्या उत्पन्नावर मोठा परिणाम होऊ शकतो. या गावांत महापालिकेला मुलभुत सुविधा द्याव्या लागणार आहेत. प्रामाणिकपणे कर भरणाऱ्या नागरिकांच्या पैशातून आता हा खर्च करावा लागेल. त्यामुळे पुणेकरांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.

### नवीन सरकारच्याच काळात होणार निर्णय

» समाविष्ट ३२ गावांमधील मालमत्ताकराची आकारणी करु नये, असा आदेश राज्य सरकारने जाहीर केला आहे. मात्र या आदेशाचे तत्काळ पालन होणे अशक्य आहे. या आदेशानुसार महापालिकेला मालमत्ता कराबाबत प्रस्ताव तयार करावा लागणार आहे. आचारसंहिता लागू झाल्याने हा प्रस्ताव तत्काळ तयार होणार नाही. प्रस्ताव तयार केला तरी आचारसंहिता असल्याने राज्य सरकारला यावर निर्णय घेता येणार नाही. निवडणुकीनंतर नवीन सरकारच्या काळातच यावर निर्णय होईल. त्यामुळे हा आदेश केवळ राजकीय फायद्यासाठी जाहीर केला असल्याची टीका राज्य सरकारवर केली जात आहे.

" पुणे महापालिकेत समाविष्ट झालेल्या ३२ गावांमधील मालमत्ताकराची वसुली करण्यास स्थगिती दिलेली नाही. कर पुनर्विचार करण्याचे आदेश दिले आहेत. आता तत्काळ करवसुली थांबवलेली नाही. मालमत्ता कराबाबतची तपासणी करावी लागणार आहे. त्यानंतर महापालिका प्रस्ताव तयार करुन राज्य शासनाला सादर करेल. त्यानंतर राज्य शासनाचा आदेशाने अंतिम निर्णय घेतला जाईल.

**- माधव जगताप, प्रमुख, करआकारणी आणि करसंकलन विभाग, पुणे महापालिका.**

---

# नियम डावलल्यास कठोर कारवाई करा

## आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी आवश्यक : जिल्हाधिकारी

**पुणे | प्रतिनिधी**

केंद्रीय निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केला असून, आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. आदर्श आचारसंहितेची सर्व प्रशासकीय यंत्रणांनी काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. आचारसंहितेच्या अनुषंगाने प्राप्त तक्रारीवर तत्काळ कारवाई करण्यात यावी. अनधिकृत होर्डिंग्जवर निवडणूक प्रचाराबाबत होत असल्याचे निदर्शनास आल्यास कठोर कारवाई करण्यात यावी. आवश्यक तेथे गुन्हे दाखल करावेत, असे आदेश जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने निवडणूक निर्णय अधिकारी, समन्वय अधिकारी यांच्या कामकाजाबाबत आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते.यावेळी पुणे महानगरपालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी., जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, यांच्यासह पिंपरी चिंचवडचे अधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम आदी उपस्थित होते.

डॉ. दिवसे म्हणाले, विधानसभा सार्वत्रिक



निवडणुकीच्या अनुषंगाने सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने कामे करुन निवडणूक प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडावी.मतदानाचा टक्का वाढविण्याकरीता मतदार नोंदणी, मतदार जनजागृतीविषयक शिबिरे आयोजित करावीत. बदलेल्या मतदान केंद्राविषयी मतदारांनी माहिती देण्यात यावी. एफएसटी पथके कार्यान्वित करण्यात यावीत.मतदान केंद्रात मोबाइल वापरण्यास प्रतिबंध करण्यात आला असून याबाबत याबाबत यंत्रणेसह मतदारामध्ये जनजागृती करावी.आवश्यकतेप्रमाणे अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण घेण्यात यावेत. जिल्ह्यात मतदान प्रक्रिया पारदर्शक, निर्भय वातावरणात आणि सुलभ, सहजतेने पार पाडण्यासाठी प्रयत्न करावे. निवडणूक प्रक्रियेत आपल्या दिलेल्या जबाबदारीप्रमाणे चोखपणे कर्तव्य पार पाडावे.

### मतदारांना सुविधा पुरवा

»मतदान केंद्रावर आवश्यक शौचालय, पाणी, व्हीलचेअर, रॅम्प, पाळणाघर, औषधोपचार, बसण्याकरीता बाकडे आदी सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात. मतदारसंघातील प्रत्येक मतदान केंद्राला भेटी देऊन उपलब्ध असलेल्या सुविधांची पडताळणी करावी. शहर हद्दीत महानगर पालिकांनी तर ग्रामीण हद्दीत जिल्हा परिषदेने या व्यवस्था करावयात असे आयोगाने निर्देश दिले आहेत.

---

# विधानसभा निवडणुकीतील पैशावर 'नजर'!

## प्राप्तिकर विभागाचे सर्व उमेदवारांवर लक्ष; नागरिकही सहभागी होऊ शकणार

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यात विधानसभा निवडणुकीचा बिगुल वाजला आहे. निवडणुकीच्या काळात अनेक उमेदवारांकडून पैशाचा गैरवापर होत असल्याचे प्रकार उघडकीस येतात. या पार्श्वभूमीवर प्राप्तिकर विभागाच्या पुणे कार्यालयाने पैशाचा गैरवापर रोखण्यासाठी मोहीम हाती घेतली आहे.

आगामी विधानसभा निवडणुकीत उमेदवारांकडून पैशाचा गैरवापर होऊ नये, यासाठी प्राप्तिकर विभागाने पावले उचलली आहेत. निवडणूक मुक्त आणि योग्य पद्धतीने व्हाव्यात यासाठी प्राप्तिकर विभागाने मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेअंतर्गत प्राप्तिकर विभागाने नियंत्रण कक्ष स्थापन केला आहे. या कक्षाच्या माध्यमातून निवडणुकीतील पैशाच्या गैरवापरावर लक्ष ठेवले जात आहे. याचबरोबर निवडणुकीतील गैरप्रकारांच्या तक्रारी नागरिकांना करता याव्यात यासाठी टोल फ्री



दूरध्वनी क्रमांक १८००२३३०३५३ व १८००२३३०३५४ सुरू करण्यात आले आहेत.

याचबरोबर नागरिक मोबाईल क्रमांक ९४२१५४६४८४ वर संदेश, व्हिडीओ आणि छायाचित्रे व्हॉट्सॲपवर पाठवून तक्रार करू शकतात. प्राप्तिकर विभागाच्या पुणे कार्यालयाच्या अंतर्गत पुण्यासह पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, अहिल्यादेवीनगर, सोलापूर, सातारा, सांगली, सिंधुदुर्ग आणि कोल्हापूर या जिल्ह्यांतील नागरिक तक्रार करू शकतात. नागरी ई-मेल अथवा पत्र पाठवूनही तक्रार नोंदवू शकतात, अशी माहिती प्राप्तिकर विभागाने दिली.

दरम्यान, महाराष्ट्र व झारखंड या दोन्ही राज्यांतील विधानसभा निवडणुकांची घोषणा १६ ऑक्टोबरला केंद्रीय निवडणूक आयोगाने केली. राज्यात २८८ जागांसाठी एकाच टप्प्यामध्ये २० नोव्हेंबर रोजी मतदान होईल. झारखंडमध्ये दोन टप्प्यांत १३ व २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. दोन्ही राज्यांत २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी केली जाईल. विधानसभा निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्यामुळे दोन्ही राज्यांमध्ये आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे.

# ..तर आमच्याशी व्यक्तिगत संपर्क करावा

## सीबीआय, एसीबीचे आवाहन, औद्योगिक परिसरात भ्रष्टाचारविरोधी जागरूकता अभियान

**पिंपरी | प्रतिनिधी**

उद्योजकांना दैनंदिन काम करताना शासकीय विभागाशी संबंध येतो. त्या कामकाजाविषयी काही अडचण निर्माण झाल्यास व्यक्तिगत येऊन आम्हाला संपर्क करावा. त्याची निश्चित दखल घेऊन त्याबाबत कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन सीबीआय विभागाचे उपअधीक्षक गोपाल नाईक यांनी पिंपरी-चिंचवड शहरातील उद्योजकांना दिले. तुमचे सहकार्य आम्हाला अपेक्षित असल्याचेही त्यांनी नमूद केले.

पिंपरी-चिंचवड लघुउद्योग संघटना व केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय), लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (एसीबी) यांच्या संयुक्त विद्यमाने भ्रष्टाचारविरोधी जागरूकता अभियान नुकतेच राबवण्यात आले. उपअधीक्षक (सीबीआय पुणे) गोपाल नाईक, पोलीस निरीक्षक श्रेया तरटे, तसेच पिंपरी चिंचवड लघुउद्योग संघटनेचे अध्यक्ष संदीप बेलसरे, उपाध्यक्ष संजय जगताप, विनोद नाणेकर, सचिव जयंत कड, खजिनदार संजय ववले, विजय खळदकर, संचालक संजय सातव, नवनाथ वायाळ, विनोद मित्तल, प्रमोद राणे, भारत नरवडे, अतुल इनामदार, सचिन आदक तसेच पिंपरी-चिंचवड शहरातील विविध ठिकाण लघुउद्योजक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



### टेबलाखालून केली जाते मागणी

» या कार्यक्रमात विविध उद्योजकांनी आपल्या व्यथा मांडल्या. त्यामध्ये बँकांकडून स्टार्टअप योजना किंवा अन्य शासकीय योजनेद्वारे केला जाणारा कर्जपुरवठा वेळेवर केला जात नाही. त्यासाठी टेबलाखालून पाकिटाची मागणी केली जाते. रेल्वे विभागाकडून कामे सहजा सहजी मिळत नाहीत. इएसआय रुग्णालयात आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जात नाही. कर्मचारी भविष्य निर्वाह निधीसाठी अडवणूक केली जाते. जीएसटी कार्यालयात चुकीची आकारणी करून पैश्याची मागणी केली जाते. एखादा कर्मचारी किंवा अधिकारी लाच घेताना सापडल्यास त्याला तात्काळ निलंबित केले जात नाही त्याचा गुन्हा सिद्ध होईपर्यंत त्याच्यावर कारवाई केली जात नाही, असे काही मुद्दे उपस्थित केले.

सीबीआय नागरीकांसाठी कशा प्रकारे उपयुक्त आहे, यासंदर्भात श्रेया तरटे यांनी माहिती दिली. लघुउद्योजकांनी त्यांना शासकीय कामात येणारे अडथळे आणि जाणीवपूर्वक होत असलेल्या अडवणुकीबाबत प्रश्न उपस्थित केले. त्यांच्या प्रश्नाला समर्पक उत्तरे देण्यात आली. लघुउद्योग संघटनेचे अध्यक्ष संदीप बेलसरे यांनी देखील लघुउद्योजकांना आवाहन केले की, अडचण असल्यास आपण सीबीआय, एसीबी पुणे यांचेशी संपर्क साधावा. आपले नाव गुप्त ठेवण्यात येईल.

# ऐन दिवाळीच्या तोंडावर कामगारांवर संक्रांत

## ना पीएफ, ना बोनस; कचरा जनजागृती करणाऱ्यांची अवस्था बिकट : कंत्राटी कामगारांचा दोन महिने पगारच नाही

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या घरोघरचा कचरा गोळा करताना नागरिकांना जनजागृती करुन त्यांना ओला, सुका आणि घातक वेगवेगळा करण्यासाठी काम करणाऱ्या कंत्राटी कामगारावर संक्रांत ओढवली आहे. ठेकेदार कंपनीकडून दोन महिने पगारच नाही. त्याशिवाय पीएफ, बोनसही मिळाला नसल्याने दिवाळीच्या तोंडावर कामगारावर उपासमारीची वेळ आली आहे.

'इंदौर पॅटर्न' पद्धतीने पिंपरी-चिंचवड महापालिकेचे तत्कालिन आयुक्त राजेश पाटील यांनी कचऱ्याचे वर्गीकरण करण्यासाठी ठेकेदाराकडून नागरिकांना जनजागृती करण्यासाठी कंत्राटी कामगारांची नियुक्ती केल्या आहेत. यामध्ये आठ प्रभागात चार संस्था काम करत होत्या. त्यानंतर आता तीनच संस्था काम करत आहेत. ओला आणि सुका कचरा वर्गीकरणाची माहिती देण्यासाठी महापालिकेने ठेकेदाराकडे काम सोपवले आहे. मात्र, ठेकेदारांने दोन महिने झाले कामगारांचा पगारच केला नाही. त्यातच कामगारांना दिवाळीचा बोनसही मिळाला नाही. पीएफसुद्धा वेळेवर भरला जात नाही.

कामगारांकडून ठेकेदाराला पगार मागितला तर कामावरून काढून टाकण्याची धमकी दिली जाते. त्यामुळे स्मार्ट सिटीचा डौल मिरविणारी महापालिका आणि त्यांच्या ठेकेदारांकडे काम करणाऱ्या कामगारांना पगार मिळत नसल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. डिव्हाईन वेस्ट मॅनेजमेंट ॲण्ड सर्व्हिसेस नावाच्या कंपनीला कचऱ्याचे अलगीकरण करण्याची माहिती देण्याचे काम देण्यात आले आहे. यांचे कर्मचारी घरोघरी जाऊन कचऱ्याच्या अलगीकरण विषयी माहिती देतात. त्यासाठी त्यांचा पगार ठरलेला आहे. मात्र, दोन महिन्यांपासून कर्मचाऱ्यांचा पगार देण्यात आला नाही.



> “ सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांना पगार वेळेत देण्याचे आदेश सर्व कंत्राटदारांना देण्यात आले आहेत. तसेच बोनस संदर्भातही त्यांना सूचना केल्या आहेत.
>
> - अजिंक्य येळे, सहाय्यक आयुक्त, महापालिका.

### घनकचरा नव्हे, धन कचरा

» शहराच्या घनकचरा व्यवस्थापनात कंत्राटदार संस्था किंवा कंपनीला मोठा नफा मिळत आहे. शासकीय नियमांची पायमल्ली करीत कचरा घरोघरी जाऊन माहिती देण्यासाठी 'स्वस्तातील' कामगार मिळवून ते काम करवून घेतात. त्यात कंत्राटदार, अधिकारी यांचा मोठा आर्थिक लाभ होतो. परंतु, मोबदल्यात त्या कामगारांना कोणत्याही सुविधा दिल्या जात नाहीत. तरी, याविषयी महापालिका संबंधित कंत्राटदारांना पाठीशी घालत आहे.

### महापालिकेचे दुर्लक्ष

» हे कंत्राटदार वर्षानुवर्षे महापालिकेला वेगवेगळ्या सेवा पुरवतात. मात्र महापालिकेकडून यापैकी कोणत्याच कंत्राटदाराला वेळेत बिले दिली जात नाहीत. अनेकदा कमिशन मागितले जाते. त्यामुळे स्वाभाविकच कंत्राटदार ज्यांना आपल्या सेवेत घेतो त्या कर्मचाऱ्यांना वेळेत पगार इतर सुविधा देऊ शकत नाही. यात सर्वात मोठी परवड होते ती कामगारांची. तर महापालिका 'ठेकेदार अन् तुम्ही बघून घ्यावे', अशा थाटात या कामगारांना दूर लोटते.

# महापालिकेनेच नियम बसवला धाब्यावर

## आचारसंहितेपूर्वी विविध कामांना मंजुरी दिल्याने ठेकेदारांची चांदी : करारनामा न करताही मिळाली काम करण्याची परवानगी

**पुणे | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणूकीची आचारसंहिता लागण्यापूर्वी महापालिकेत विविध कामांना मंजूरी देण्याची लगीनघाई सुरु होती. या घाईत महापालिकेने स्वत:च तयार केलेला नियम धाब्यावर बसवला असल्याचे समोर आले आहे. स्थायी समितीमध्ये निविदा मंजूर झाल्यानंतर ठेकेदाराने करारनामा करून घ्यावा, त्यानंतरच खात्याने वर्कऑर्डर द्यावी, असे आदेश महापालिका आयुक्तांनी काढले होते. मात्र या नियमाला केराची टोपली दाखवत आचारसंहितेमध्ये कामे अडकू नयेत यासाठी करारनामा न करताच वर्कऑर्डर देण्याचे आदेश आयुक्तांनी दिले आहे. महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले कडक शिस्तीचे आणि नियमाला धरुन चालणारे अशी त्यांची ओळख आहे, त्यांनीच हा आदेश दिल्याने सर्वांच्या भुवया उंचावल्या आहेत.




पुणे महापालिकेकडून शहरात विविध प्रकल्प राबवले जातात. तसेच पायाभूत सुविधांची कामे केली जातात. ही कामे करण्यासाठी महापालिका ठेकेदारासोबत करारनामा करते. त्यांनतर त्याला संबंधित काम करण्याची परवानगी देते. असा नियम आयुक्तांनीच तयार केला आहे. मात्र, नागरिकांना खुश करण्यासाठी तसेच कोणतीही कामे आचारसंहितेत कामे अडकू नयेत, यासाठी महापालिकेच्या स्थायी समितीमध्ये ऐनवेळी प्रस्ताव दाखल करुन एकूण २२० प्रस्तावांना मान्यता दिली आहे. सुरवातीला ४०० कोटींची कामे केली जाणार असल्याचे सांगण्यात आले. मात्र प्रत्यक्षात जस-जशी माहिती समोर येत आहे ,त्यानुसार घनकचरा, रस्ते, पाणी पुरवठा, क्षेत्रीय कार्यालये, उद्यान, सांडपाणी व्यवस्थापन यासह अन्य विभागांच्या सुमारे ५०० कोटी रुपयांच्या निविदा मंजूर झाल्या आहेत. आचारसंहिता लागू होण्यापूर्वीच कामे करण्याची परवानगी द्यावी लागते. ठेकेदारांनी महापालिकेच्या नगर सचिव कार्यालयात गर्दी केली होती. या कार्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळ सुरक्षा लावण्याची वेळ महापालिका प्रशासनाला आली होती. करारनाम्यापासून पळवाट काढल्याने वर्कऑर्डर काढून घेणे सोपे झाल्याने ठेकेदारांसह अधिकाऱ्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलले आहे.

लोकसभा निवडणूक गेल्या काही दिवसांपूर्वी पार पडली. निवडणूकीची आचारसंहिता लागू होण्याचा प्रशासनाला अंदाज असतो. त्यानुसार महापालिकेच्या प्रत्येक विभागाकडून केल्या जाणाऱ्या प्रत्येक कामाची यादी तयार केली जाते. त्यासाठी अंदाजे खर्च काढला जातो. त्यानुसार प्रस्ताव सादर केला जातो. विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता ऑक्टोबर महिन्यात लागणार असल्याचे प्रशासनाला माहिती होते. त्यामुळे प्रत्येक विभागाकडून त्यांच्याकडील कामांच्या निविदा काढून त्यास स्थायी समितीची मान्यता घेण्यासाठी गडबड सुरु झाली होती. पण करारनामा करण्याच्या प्रक्रियेमुळे वेळ वाया जाऊन कामाच्या वर्कऑर्डर निघणार नाहीत, कामे रखडतील अशा तक्रारी ठेकेदार व अधिकाऱ्यांकडून करण्यास सुरुवात झाली. या विषय आयुक्तांपर्यंत गेल्यानंतर विभागप्रमुखांनीही त्यांची बाजू मांडली. त्यामुळे जुलै महिन्यात काढलेल्या आदेशास आयुक्त भोसले यांनी विधानसभा निवडणूक होईपर्यंत स्थगिती देण्याचा निर्णय घेतला आहे. पुणे महापालिकेत देखभाल दुरुस्तीसह नव्या प्रकल्पांच्या कामासाठी, रस्ते, पाणी, विद्युत, घनकचरा यासह अनेक विभागात दरवर्षी हजारो कोटी रुपयांच्या निविदा काढल्या जातात. वित्तीय समितीची मान्यता, इस्टिमेट समितीची मान्यता झाल्यानंतर त्यानुसार आलेल्या निविदा स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी ठेवल्या जातात. स्थायी समितीने मान्यता दिल्यानंतर ठेकेदारांकडून वर्कऑर्डर घेण्याची गडबड सुरु असते.

> वर्कऑर्डर देण्यापूर्वी करारनामा करण्याची यापूर्वी पध्दत नव्हती. मध्यंतरी ती सुरु करण्यात आली होती. विधानसभा निवडणूकीची आचारसंहिता लागण्याची शक्यता लक्षात घेता महापालिकेला करारनामा करुन वर्कऑर्डर देणे शक्य झाले नसते. कामांना वेग येण्यासाठी हा नियम केवळ विधानसभा निवडणूकीच्या आचारसंहितेसाठी शिथिल करण्यात आला आहे. त्यांची वर्कऑर्डर झालेली आहे, त्यांना करारनामा करावाच लागणार आहे. तशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. संबंधित विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांना काम करताना वेळ जाणार नाही, याचा विचार करण्यात आला होता.
>
> **- अनिरुद्ध पावसकर, पथ विभागप्रमुख, पुणे महापालिका.**

# पावसाने घेतला 30 हजार हेक्टरवरील पिकांचा घास

## सर्वाधिक फटका नाशिक जिल्ह्याला : 26 हजार हेक्टरवरील पिकांची हानी

**पुणे | प्रतिनिधी**

ऐन पीक कापणीच्या वेळेस परतीच्या पावसाने शेतकऱ्यांना मोठा तडाखा दिला आहे. राज्यात ऑक्टोबरमध्ये तब्बल ३० हजार ५०६ हेक्टरवरील पिकांचे अतिवृष्टीमुळे अतोनात नुकसान झाले असून हातातोंडाशी आलेला घास पावसाने हिरावल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. या पावसामुळे नाशिक जिल्ह्यातील २६ हजारांहून अधिक हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. काढणीला आलेल्या सोयाबीन पिकाला याचा सर्वात मोठा फटका बसला आहे.



परतीच्या मान्सूनने राज्यातील अनेक भागांना तडाखा दिला आहे. १ ऑक्टोबर ते १५ ऑक्टोबर या काळात झालेल्या अतिवृष्टीमुळे काढणीला आलेल्या सोयाबीन, मका, कापूस, बाजरी, भाजीपाला, कांदा, ज्वारी, मूग, उडीद, भात अशी उभी पिके झोपली. या पिकांचे पावसामुळे अतोनात नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची चार महिन्यांची मेहनत पाण्यात वाहून गेली आहे. नुकसान झालेल्या भागांमध्ये प्रामुख्याने उत्तर महाराष्ट्र, विदर्भ तसेच पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांचा समावेश आहे.

> पावसाने अतोनात पिकांचे केले असून नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे महसूल विभाग तसेच कृषी विभागाच्या समन्वयातून केले जात आहेत. पंचनाम्यांचा अहवाल जिल्हा प्रशासनामार्फत राज्य सरकारला पाठविण्यात येणार आहे.
>
> **- रफिक नायकवडी, कृषी संचालक, पुणे.**

### चार जिल्ह्यांनाच अधिक फटका

» ऑक्टोबरच्या पंधरा दिवसांमध्ये राज्यातील ठाणे, नाशिक, सांगली व भंडारा या चार जिल्ह्यांमधील ३० हजार ५०४ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. कृषी विभागाने तातडीने पंचनामे केले आहेत.

» सर्वाधिक २६ हजार ३३८ हेक्टरवरील पिकांचे नुकसान एकट्या नाशिक जिल्ह्यातील झाले आहे.

» त्या खालोखाल २ हजार ४२४ हेक्टरवरील पिकांचे नुकसान सांगली जिल्ह्यात झाले आहे. - भंडारा जिल्ह्यात १ हजार २८० तर ठाणे जिल्ह्यात ४५१ हेक्टर पिकांचे नुकसान झाल्याचा अंदाज कृषी विभागाने वर्तविला आहे.